# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०४ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## सुमंतराव पेंढरकर यांचे निधन

**मुंबई :** प्रसिद्ध आयुर्वेदिक उत्पादन कंपनी 'विको लॅबोरेटरीज'ला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणारे उद्योगपती आणि कंपनीचे संचालक सुमंतराव पेंढरकर यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने उद्योग, सामाजिक आणि आयुर्वेद क्षेत्रात शोककळा पसरली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले की, "विकोला जागतिक ओळख मिळवून देणारे सुमंतराव पेंढरकर यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक कर्तृत्ववान उद्योगरत्न गमावले आहे.

## विद्यार्थी आंदोलन : राज्यांना फौजदारी खटले मागे घेण्याचे स्वातंत्र्य

**नवी दिल्ली :** दिल्लीत काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी देशातील निवडक राज्यांमध्येही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. आंदोलनावेळी पोलिसांवर हल्ला होणे, सार्वजनिक संपत्तीची नासधूस करणे असे प्रकार घडले. यामुळे ठिकठिकाणी हिंसा करणाऱ्यांविरोधात गुन्हे नोंदविण्यात आले. आता या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना उद्देशून स्पष्ट निर्देश दिले आहेत.

## थोडक्यात वार्ता

### प्रवीण टाके यांनी स्वीकारला छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय माहिती उपसंचालक पदाचा कार्यभार!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे अनुभवी अधिकारी प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे नवे माहिती उपसंचालक म्हणून अधिकृतरीत्या आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या आगमनामुळे विभागाच्या शासकीय जनसंपर्क व प्रचार मोहिमेला अधिक गती मिळणार असून, पत्रकारिता आणि प्रशासकीय क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव विभागासाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे. माहिती उपसंचालक पदाची धुरा हाती घेण्यापूर्वी प्रवीण टाके हे कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून यशस्वीपणे कार्यरत होते. २००८ मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात रुजू झाल्यानंतर त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम पाहण्यासोबतच, मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना शासकीय मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य' मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणूनही उत्कृष्ट कार्य केले आहे. याशिवाय चंद्रपूर, नागपूर आणि नांदेड या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदाची धुरा सांभाळली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शासकीय सेवाकार्याची दखल घेऊन त्यांना सन २०१९-२० चा प्रतिष्ठित 'यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देखील जाहीर झाला होता.

### लैंगिक छळ प्रकरणात बृजभूषण शरण सिंह निर्दोष



**नवी दिल्ली :** भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांना महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक छळ प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने पुरेसे पुरावे उपलब्ध नसल्याचे नमूद करत त्यांची आणि सहआरोपी विनोद तोमर यांची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाचा निकाल जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी आनंद व्यक्त करत जल्लोष केला.

निर्णयानंतर माध्यमांशी बोलताना बृजभूषण शरण सिंह यांनी सांगितले की, आरोप झाल्याच्या पहिल्या दिवसापासून आपण निर्दोष असल्याचे सांगत होतो. "जर माझ्यावरील एकही आरोप सिद्ध झाला असता, तर मी स्वतःला फाशी दिली असती. आज न्यायालयाने मला सन्मानाने निर्दोष मुक्त केले आहे. हा दिवस माझ्यासाठी आणि माझ्या समर्थकांसाठी आनंदाचा आहे," असे त्यांनी म्हटले.

या प्रकरणात 2016 ते 2019 या कालावधीत भारतीय कुस्ती महासंघाचे कार्यालय, अधिकृत निवासस्थान आणि परदेश दौऱ्यांदरम्यान काही महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचे आरोप करण्यात आले होते. 2023 मध्ये विनेश फोगट, साक्षी मलिक आणि बजरंग पुनिया यांच्यासह अनेक आघाडीच्या कुस्तीपटूंनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपपत्र न्यायालयात सादर केले होते.

### "शाल जोडे"




## महाराजस्व अभियानांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या वतीने प्रदर्शनाचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी





**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, खुलताबाद प्रकल्पाच्या वतीने विविध सेवा, योजना आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आकर्षक प्रदर्शन व माहितीपर स्टॉल उभारण्यात येऊन माहिती देण्यात आली

खुलताबाद येथील यशोदा लॉन्स मध्ये आयोजित या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये संरक्षणात्मक, ऊर्जावर्धक व शरीरवर्धक आहाराचे महत्त्व, गरोदर माता, स्तनदा माता व ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी योग्य पोषण आहार, विविध पाककृतींचे प्रदर्शन करण्यात आले. स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्यांपासून पौष्टिक आहार कसा तयार करता येतो, याचे प्रात्यक्षिकही देण्यात आले.

याशिवाय नवचेतना व आधारशिला उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कृतींचे सादरीकरण करण्यात आले.

अंगणवाडी सेविका व मातांनी स्वतः तयार केलेल्या शैक्षणिक अध्ययन-अध्यापन साहित्याची (TLM) आकर्षक मांडणी करण्यात आली. "भविष्याचे झाड", "टिकली चार्ट", संवेदनशील पालकत्व, बालसंगोपन, बालविकास आणि प्रारंभिक शिक्षण यांसंदर्भातील विविध कृतींमधून उपस्थित नागरिकांना प्रभावी संदेश देण्यात आला.

या स्टॉलला मा. आमदार प्रशांतजी बंब यांनी भेट देऊन प्रत्येक उपक्रमाची सविस्तर माहिती जाणून घेतली. व भविष्याचे झाड या कृती करून बघीतली व भावी पिढी सोडविण्यासाठी संदेश दिला.त्यांनी अंगणवाडी स्तरावर राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे विशेष कौतुक करत भावी पिढी सुदृढ, सुसंस्कारित व सक्षम घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे आपल्या अभिप्रायातून व्यक्त केले. तसेच अंगणवाड्यांना आवश्यक असणारे शैक्षणिक कृती साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

प्रकल्पामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे छायाचित्रे, माहिती व सादरीकरण (Presen-tation) तयार करून त्याचे प्रभावी दस्तऐवजीकरण करण्याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी सभापती सुनीताताई संजय खंडागळे, उपसभापती मंदाताई बद्रीनाथ वाकळे, जिल्हा परिषद सदस्या रेखाताई प्रकाश चव्हाण, प्रतीक्षाताई विकास कापसे, योगीता नारायण बर्डे दिनेशभाऊ आंभोरे, प्रकाश वाकळे, एल जी गायकवाड माजी जि प उपाध्यक्ष परसराम बारगळ तसेच इतर मान्यवरांनी स्टॉलला भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केली आणि त्यांचे कौतुक केले.

हा उपक्रम एस के शिंदे प्र. बाल विकास प्रकल्प अधिकारी, तथा पर्यवैक्षिका खुलताबाद यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संगिता काथार व द्रोपदी रोकडे पर्यवेक्षिका यांच्या समन्वयातून यशस्वीपणे राबविण्यात आला. या उपक्रमासाठी सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, माता आणि लाभार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या प्रदर्शनातून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पोषण, आरोग्य, पूर्व प्राथमिक शिक्षण, संवेदनशील पालकत्व आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या विविध उपक्रमांची व लेक लाडकी व प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनाची प्रभावी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचली. समाजाच्या सहभागातून सुदृढ, निरोगी आणि सक्षम भावी पिढी घडविण्याच्या दिशेने हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला.

## सातारा-देवळाई पाणीपुरवठ्यासाठी किशोर शितोळे आक्रमक ; रखडलेल्या योजनेला गती

### मुख्य जलवाहिनी जोडण्याचे आश्वासन; तीन पाण्याच्या टाक्यांची कामे अंतिम टप्प्यात

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** सातारा-देवळाई परिसरातील अनेक दिवसांपासून रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळावी, या उद्देशाने भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी सोमवारी संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि नागरिकांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी नागरिकांनी पाणीपुरवठ्यातील दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

पाहणीवेळी प्रभाग समितीच्या सभापती तथा नगरसेविका सविताताई कुलकर्णी, नगरसेवक पदमसिंग राजपूत, ज्ञानेश्वर बोरसे, सेलूकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, संबंधित अधिकारी, कंत्राटदार तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणीदरम्यान सातारा पोलीस ठाण्यामागील टाकीच्या मुख्य जलवाहिनीचे कनेक्शन तातडीने पूर्ण करण्याची मागणी करत किशोर शितोळे यांनी घटनास्थळीच ठिय्या मांडला. पाणीपुरवठ्यातील विलंबाबाबत त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना जाब विचारत काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यावर कंत्राटदाराने आजच रात्री मुख्य पाइपलाइनची जोडणी पूर्ण करण्याचे तसेच बीड बायपास क्रॉसिंगचे काम आज-उद्यामध्ये पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर अमीरनगर, एजीपी शाळेजवळील, म्हाडा परिसरातील तसेच आलोकनगर येथील पाण्याच्या टाक्यांच्या कामांचीही पाहणी करण्यात आली. या टाक्यांची कामे अंतिम टप्प्यात असून केवळ किरकोळ कामे शिल्लक असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मुख्य जलवाहिनीवरून टाक्यांना जोडणी करण्यासाठी शटडाऊन आवश्यक असल्याने काही दिवसांचा कालावधी लागणार आहे. मात्र सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील १५ ते २० दिवसांत या भागातील नियमित पाणीपुरवठा सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

यावेळी किशोर शितोळे यांनी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. "सातारा-देवळाई परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू नये, हीच आमची भूमिका आहे. रखडलेली कामे तातडीने पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू. नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड होऊ देणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

## पिशोर पोलिसांची कारवाई; 2.24 लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त, एकावर गुन्हा दाखल!



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

पिशोर पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध मद्यविक्री विरोधात मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी केलेल्या छापासत्रात तब्बल २ लाख २४ हजार ८० रुपयांचा अवैध देशी व विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिशोर पोलिसांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार, पोलिसांनी चिंचोली ली., ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असलेल्या विनोदकुमार रामगोपाल जैस्वाल (वय ४८ वर्षे) यांच्या घरावर छापा टाकला. या कारवाईदरम्यान आरोपीकडे कोणताही वैध परवाना किंवा परवानाधारक कागदपत्रे नसताना, विक्रीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीररीत्या देशी व विदेशी मद्याचा साठा करून ठेवल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळावरून विविध ब्रँड्सचा मद्यसाठा आणि मुद्देमाल म्हणून जप्त केला आहे.

याप्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये विनोदकुमार रामगोपाल जैस्वाल यांच्याविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तापासाची सूत्रे पोलीस बर्डे यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखालील पथकात पोलीस उपनिरीक्षक विश्वजित फरताडे, सहायक फौजदार कराळे, बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश कव्वाल, पवन खंबाट, सपकाळ, भोटकर, महिला पोलीस शिपाई देवरे तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस हवालदार अमोल गायकवाड, पो.कॉ. मयूर वाळुंजकर, पो.कॉ. घुगे आणि पो.कॉ. प्रमोद सोनवणे यांनी या संयुक्त मोहिमेत सहभाग घेऊन यशस्वी कारवाई पूर्ण केली.

## 136 इन्फंट्री बटालियन (टीए) इको महारमध्ये भूतपूर्व सैनिक व महिला वन कर्मचाऱ्यांसाठी भरती मेळावा

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील 136 इन्फंट्री बटालियन (टेरिटोरियल आर्मी) इको महारमध्ये सशस्त्र दलातील भूतपूर्व सैनिक आणि वने व हवामान बदल मंत्रालय तसेच राज्य वन विभागातील भूतपूर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्याचा पहिला टप्पा १ ते ४ सप्टेंबर २०२६ दरम्यान 109 इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा एलआय, कोल्हापूर येथे, तर दुसरा टप्पा ८ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान एआरओ ग्राउंड, छत्रपती संभाजीनगर येथे दररोज सकाळी ५ वाजल्यापासून पार पडणार आहे.

या भरती प्रक्रियेत महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी जेसीओची ४ पदे आणि सोल (जीडी) ची १६२ पदे उपलब्ध आहेत. तसेच संपूर्ण भारतातील पात्र उमेदवारांसाठी ट्रेड्समन, सोल क्लार्क (जीडी), हेअर ड्रेसर, मेस कीपर, स्टिवर्ड, हाऊस कीपर, शेफ कम्युनिटी आणि वॉशरमन या पदांची भरती केली जाणार आहे. या भरतीसाठी निवृत्तिवेतनधारक भूतपूर्व सैनिक किंवा संबंधित वन विभागांमध्ये किमान २० वर्षे सेवा केलेले आणि सेवानिवृत्तीपासून ५ वर्षांच्या आत नोंदणी केलेले भूतपूर्व महिला कर्मचारी पात्र असतील. उमेदवारांची वैद्यकीय श्रेणी 'शेप-1' असणे, चारित्र्य उत्तम असणे आणि कोणत्याही फौजदारी किंवा दिवाणी प्रकरणात सहभाग नसणे अनिवार्य आहे.

## आदर्श बँक घोटाळ्याप्रकरणी ठेवीदारांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण; एकाला आली चक्कर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या २०० कोटी रुपयांच्या गाजलेल्या घोटाळा प्रकरणी हक्काच्या पैशांसाठी खातेदार आणि ठेवीदारांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक होत उपोषण सुरू केले आहे. ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या या आंदोलनादरम्यान उपोषणाला बसलेल्या एका ज्येष्ठ ठेवीदारास अचानक चक्कर आल्याने ते जागेवरच कोसळले. या घटनेमुळे आंदोलनात काही काळ तणाव निर्माण झाला असून, ठेवीदारांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गेल्या काही काळापासून आदर्श बँकेच्या ठेवीदारांच्या न्यायासाठी हा लढा सुरू असून, आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या विरोधात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा कायम सुरू राहणार असून, जोपर्यंत सर्व ठेवीदारांना त्यांचा हक्काचा पैसा परत मिळत नाही, तोपर्यंत हा संघर्ष असाच सुरूच राहील, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, प्रशासकीय पातळीवर या घोटाळ्याप्रकरणी ठोस कारवाई व्हावी आणि ठेवीदारांच्या कष्टाची कमाई त्यांना लवकरात लवकर परत मिळावी, यासाठी संतप्त खातेदारांनी प्रशासनाकडे तीव्र रोष व्यक्त केला आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## पोलीस पाटील व्यवस्थेला नवी दिशा; छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांकडून जिल्ह्यात प्रथमच कर्तव्य मार्गदर्शन शिबिर संपन्न!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचा पहिला बुरुज मानल्या जाणाऱ्या पोलीस पाटील व्यवस्थेला अधिक सक्षम, सजग आणि अद्ययावत बनवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने आज 'कैलास शिल्प' सभागृहात जिल्ह्यात प्रथमच 'पोलीस पाटील कर्तव्य मार्गदर्शन शिबिराचे' आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक मा. श्री. प्रकाश जाधव यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या शिबिरात जिल्ह्यातील सर्व ५७३ पोलीस पाटलांना आधुनिक काळातील प्रतिबंधात्मक पोलीसिंगची दिशा देण्यात आली. या कार्यक्रमात उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या २१ पोलीस पाटलांचा विशेष सत्कार करण्यात आला, तसेच सर्व उपस्थित पोलीस पाटलांना 'पोलीस पाटील कर्तव्य मार्गदर्शिका' या विशेष पुस्तिकेचे वितरण करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकाश जाधव पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उपस्थित होते. तसेच प्रशांत स्वामी अपर पोलीस अधीक्षक यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, शाखा प्रमुख आणि जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी आपल्या मार्गदर्शनात पोलीस पाटलांच्या बदलत्या आणि अत्यंत महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था ही पोलीस पाटील, ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्या समन्वयातून अधिक सक्षम होते. गावातील अनधिकृत पुतळे बसू न देणे, सण-उत्सव व मिरवणुकांमध्ये शांतता राखणे, जातीय सलोखा टिकवणे, सोशल मीडियावरील अफवांवर लक्ष ठेवणे आणि गंभीर गुन्हा घडण्यापूर्वी प्रशासनाला सतर्क करणे ही प्रत्येक पोलीस पाटलाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे.

यावेळी त्यांनीशहरासह ग्रामीण भागातही दुचाकी अपघातांचे वाढते प्रमाण चिंताजनक असल्याचे सांगत पोलीस पाटलांना आपल्या गावात वाहतूक जनजागृती अभियान राबविण्याचे आवाहन केले. विशेषतः युवा पिढीमध्ये हेल्मेटचा वापर, वाहतूक नियमांचे पालन आणि अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यापासून परावृत्त करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळा व युवक मंडळांच्या माध्यमातून सातत्याने जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

कार्यक्रमादरम्यान ५७३ पोलीस पाटलांच्या दैनंदिन कार्यात उपयुक्त ठरणारे संदर्भपुस्तक म्हणून 'पोलीस पाटील कर्तव्य मार्गदर्शिका' या विशेष पुस्तिकेचे प्रकाशन व वितरण करण्यात आले. या मार्गदर्शिकेत महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियमांतर्गत कर्तव्ये व कायदेशीर अधिकार, प्रतिबंधात्मक पोलीसिंग आणि संवेदनशील घटनांचे व्यवस्थापन, तसेच आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक जनजागृती आणि माहिती संकलन पद्धती यांचा सविस्तर समावेश करण्यात आला आहे.

जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संतोष तुकाराम गावंडे (मागेगाव, पो.ठा. गंगापूर), संतोष काशीनाथ पगारे (औराळा, देवगाव), भालचंद्र विनायक पाटील (डोणगाव, शिल्लेगाव), नितीन पांडुरंग बागुल (खंडाळा, वैजापूर), बाळकृष्ण खंडेराव सामसे (गाढे पिंपळगाव, विरगाव), ज्योती पंढरीनाथ निकम (पोखरी, शिवूर), निलेश संतोष बलसाने (चिंचोली, पिशोर), रघुनाथ काशीनाथ चव्हाण (तिसगाव, खुलताबाद), हिरालाल लालचंद मेहर (पांगर, कन्नड ग्रामीण), चंद्रकांत पितांबर जाधव (वांगी, सिल्लोड ग्रामीण), दगडु तुळशीराम मैद (अंभई, अजिंठा), श्रीराम प्रल्हाद जाधव (वेताळवाडी, सोयगाव), विलास नागप्पा कुल्हे (सावळदबारा, फर्दापूर), कल्याण बाबूराव ठोंबरे (वरुडकाझी, चिकलठाणा), शेख अजिज शेख भिकन (नायगाव, फुलंब्री), सांडू भाऊराव राऊत (निधोना, वडोदबाजार), सुभाष भास्करराव बागल (लाडगाव, करमाड), गोकुळ भिकाजी लगडे (आनंदपूर, पैठण), कडूबाळ खंडू चाबुस्कवार (वाघुंडी, एम पैठण), हरेराव भिमराव बोडखे (चिंचाळा, पाचोड) आणि किरण प्रकाशराव वाघ (लोहगाव, बिडकीन) या २१ पोलीस पाटलांचा मा. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# संपादकीय

## बृजभूषण शरण सिंह निर्दोष : दोष कायद्यात, की तपासात?

भारतीय कुस्ती महासंघाचे (WFI) माजी अध्यक्ष आणि माजी खासदार बृजभूषण शरण सिंह यांची दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने महिला कुस्तीपटूंच्या कथित लैंगिक छळ प्रकरणात पुरेशा पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या निर्णयामुळे बृजभूषण शरण सिंह आणि त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असले, तरी सामान्य माणसाच्या आणि क्रीडाप्रेमींच्या मनात एक अत्यंत गंभीर व अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण झाला आहे— 'या संपूर्ण प्रकरणात त्रुटी किंवा कमतरता नक्की कुठे राहिली? कायद्यात, सिस्टीममध्ये की पोलिसांच्या तपास यंत्रणेत?' देशाला आंतरराष्ट्रीय मंचावर सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके मिळवून देणाऱ्या ऑलिम्पियन आणि अव्वल महिला कुस्तीपटूंनी जेव्हा दिल्लीच्या जंतर-मंतरवर रस्त्यावर उतरून महिनाभर आंदोलनाचे रान उठवले, तेव्हा संपूर्ण देश सुन्न झाला होता. देशाची मान अभिमानाने उंचावणाऱ्या खेळाडूंना न्यायासाठी रस्त्यावर बसावे लागणे हीच मुळात सिस्टीमच्या अपयशाची पहिली साक्ष होती. त्यानंतर प्रचंड जनरेट्यामुळे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर दिल्ली पोलिसांनी १५ जून २०२३ रोजी भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३५४-ए आणि ३५४-डी अंतर्गत गुन्हे दाखल करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. मात्र, सुनावणीअंती "पुरेसे पुरावे उपलब्ध नाहीत" असे नमूद करत न्यायालयाने बृजभूषण शरण सिंह आणि सहआरोपी विनोद तोमर यांची निर्दोष मुक्तता केली. न्यायालय हे केवळ पुराव्यांच्या आणि कायद्याच्या चौकटीत चालते, भावनांवर नाही. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. परंतु, येथेच प्रश्न उपस्थित होतो की, जर देशातील आघाडीच्या आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या महिला खेळाडूंनी केलेले आरोपही पुराव्यांच्या अभावी न्यायालयात टिकू शकत नसतील, तर देशातील सामान्य आणि तळागाळातील महिलांच्या न्यायाचे काय? पोलिसांच्या तपास यंत्रणेने पुरावे गोळा करण्यात हलगर्जीपणा केला का? की राजकीय प्रभावामुळे किंवा दबावामुळे सुरुवातीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर ठोस पुरावे गोळाच केले गेले नाहीत? या प्रकरणात एका अल्पवयीन कुस्तीपटूने केलेला 'पॉक्सो' (POCSO) अंतर्गतचा गुन्हा तक्रार मागे घेतल्याने बंद झाला, ही गोष्टसुद्धा आपल्या कायदेशीर यंत्रणेतील त्रुटींवर प्रकाश टाकणारी आहे. या संपूर्ण राजकीय व कायदेशीर संघर्षात बृजभूषण शरण सिंह यांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची उमेदवारी गमवावी लागली, जरी त्यांच्याऐवजी त्यांच्या मुलाला उमेदवारी मिळून ते निवडून आले तरीही. आता न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांचा राजकीय पुनर्जन्म झाला असला, तरी या प्रकरणाने भारतीय क्रीडा क्षेत्राला आणि क्रीडा महासंघांमधील अंतर्गत कारभाराला दिलेला तडाखा सहजासहजी भरून निघणारा नाही. जर तक्रारींनंतरही न्यायालयात पुरावे सिद्ध होत नसतील, तर एकतर यंत्रणा सक्षम पुरावे गोळा करण्यात अपयशी ठरते किंवा सुरुवातीला होणारे आरोप आणि आंदोलने राजकीय हेतूने प्रेरित असतात, असा चुकीचा संदेश समाजात जातो. हा निर्णय भारतीय क्रीडा महासंघांमधील पारदर्शकता, महिला खेळाडूंचे सुरक्षित वातावरण आणि आपली पोलीस तपास यंत्रणा (Investigating Agencies) या सर्वांवर पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आहे. न्याय मिळण्यात होणारा विलंब आणि पुराव्यांअभावी होणारी सुटका ही कायद्याची कमजोरी आहे की यंत्रणेची लाचखोर/सैल मानसिकता, याचे प्रामाणिक आत्मपरीक्षण करण्याची वेळ आता आली आहे.

## स्वत:साठी नव्हे...दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरणारे शिक्षक दांपत्याचे हात!

### १४ वर्षांपासून निःस्वार्थ समाजसेवेचा अखंड प्रवास एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनची प्रेरणादायी गाथा

आजच्या स्पर्धेच्या, स्वार्थाच्या आणि प्रसिद्धीच्या युगात समाजसेवा हा शब्द अनेकदा केवळ भाषणांमध्ये ऐकायला मिळतो. परंतु काही माणसे अशी असतात की, त्यांना प्रसिद्धीपेक्षा एखाद्या गरजूच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधानाचे हास्य अधिक मौल्यवान वाटते. एखाद्या विद्यार्थ्याच्या हातात नवीन दप्तर देताना त्याच्या डोळ्यांत दिसणारी स्वप्ने, निराधार वृद्धांच्या चेहऱ्यावर दिसणारा मायेचा स्पर्श आणि समाजातील उपेक्षित घटकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्यासाठी आयुष्य समर्पित करणारी माणसे आजही आपल्या समाजात आहेत. त्याच जिवंत उदाहरणाचे नाव म्हणजे बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर.

गेल्या १४ वर्षांपासून कोणतेही सरकारी अनुदान न घेता, कोणत्याही आर्थिक अपेक्षेशिवाय आणि कोणत्याही प्रसिद्धीच्या मोहापासून दूर राहून ही संस्था महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाज, एकल पालकांच्या कुटुंबातील विद्यार्थी, वस्तीगृहातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सातत्याने कार्य करत आहे. प्रत्येक वर्षी शेकडो विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य किट देऊन त्यांच्या शिक्षणाच्या वाटेवरील आर्थिक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न संस्था करत आहे. भटक्या विमुक्त समाजातील अनेक मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणलेले आहे.

शिक्षण ही केवळ पदवी मिळविण्याची प्रक्रिया नाही; तर ती आयुष्य घडविण्याची ताकद आहे. अनेक गरीब कुटुंबांतील मुले केवळ वह्या, पुस्तके, दप्तर किंवा आवश्यक साहित्य नसल्यामुळे शिक्षणापासून दूर जातात. अशा वेळी एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन त्यांच्या हातात केवळ साहित्य देत नाही, तर त्यांच्या स्वप्नांना आधार देत असते. प्रत्येक किटमध्ये एका मुलाच्या उज्ज्वल भविष्याची आशा दडलेली असते.

संस्थेचे कार्य केवळ विद्यार्थ्यांपुरते मर्यादितच नाही तर समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यालाही त्यांनी मायेची ऊब दिली आहे. संस्थेच्या माध्यमातून विनाअनुदानित चालविण्यात येणाऱ्या "माई वृद्धाश्रम" मध्ये आज २५ अनाथ, निराधार आणि आधारविना राहिलेल्या आजींना सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. वृद्धाश्रम म्हणजे केवळ निवारा नव्हे, तर त्यांच्यासाठी एक कुटुंब, एक आधार आणि जगण्याची नवीन उमेद आहे. आपल्या आयुष्याची संपूर्ण कमाई कुटुंबासाठी खर्च करणाऱ्या अनेक मातांना शेवटी जर समाजानेच आधार दिला, तर त्यापेक्षा मोठे पुण्य कोणते?

या महान कार्यामागे उभे आहेत शिक्षक दांपत्य समाजभूषण रामदास वच्छालामाई रखमाजी वाघमारे आणि वाघमारे सरांची धर्मपत्नी माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा रामदास वाघमारे. हे शिक्षक दांपत्य शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे कार्य ते करतातच; परंतु त्याही पुढे जाऊन त्यांनी आपल्या वैयक्तिक उत्पन्नातून आणि समाजातील दात्यांच्या सहकार्याने हजारो गरजूंच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. त्यांनी समाजसेवा ही केवळ जबाबदारी नव्हे, तर जीवनमूल्य म्हणून स्वीकारली आहे.

त्यांच्या या निःस्वार्थ सेवाभावाची दखल महाराष्ट्र शासनाने घेत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार" प्रदान करून त्यांचा गौरव केला. एवढेच नव्हे, तर भारतीय टपाल विभागाने विशेष टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर मानाचा मुजरा केला. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी संस्थांकडूनही त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. मात्र या सर्व सन्मानांपेक्षा एखाद्या विद्यार्थ्याच्या यशाची बातमी किंवा एखाद्या वृद्धेच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे हास्य त्यांच्यासाठी अधिक मौल्यवान आहे.

एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनचे कार्य वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रमांद्वारे सुरू असते. शैक्षणिक साहित्य वाटप, रक्तदान शिबिरे, महिला आरोग्य व मासिक पाळी स्वच्छता जनजागृती, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, दिव्यांग आणि गरजू कुटुंबांना मदत, अन्नदान, सामाजिक प्रबोधन अशा अनेक उपक्रमांमधून संस्था समाजाशी आपले नाते अधिक दृढ करत आहे. प्रत्येक उपक्रमामागे एकच संदेश आहे "माणुसकी हीच सर्वात मोठी संपत्ती."

आज अनेक संस्था समाजसेवेचे मोठे दावे करतात; पण बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनने गेल्या चौदा वर्षांत कृतीतून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेने दिलेली मदत म्हणजे दान नसून स्वाभिमानाने जगण्याची संधी आहे. शिक्षणासाठी दिलेली किट म्हणजे केवळ साहित्य नाही; तर एका कुटुंबाच्या भविष्याचा पाया आहे. वृद्धाश्रमातील सेवा म्हणजे केवळ निवारा नाही; तर आयुष्याच्या संध्याकाळी मिळालेला सन्मान आहे.

आज समाजात बदल घडविण्यासाठी केवळ शासनाच्या योजना पुरेशा नाहीत. समाजातील संवेदनशील नागरिकांनीही आपली सामाजिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन हे त्याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. या संस्थेच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून आहेत, अनेक निराधार मातांना सुरक्षित जीवन लाभले आहे आणि अनेक गरजू कुटुंबांना जगण्याची नवी आशा मिळाली आहे.

समाज बदलण्यासाठी मोठ्या संपत्तीची गरज नसते; गरज असते ती मोठ्या मनाची. ज्या हातांनी स्वतःचे सुख बाजूला ठेवून दुसऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसले, तेच हात खऱ्या अर्थाने समाजाचे भाग्यविधाते ठरतात. बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनने हे सिद्ध करून दाखवले आहे की, सेवा ही प्रसिद्धीसाठी नव्हे तर परिवर्तनासाठी असते.

आज प्रत्येक नागरिकाने अशा सेवाभावी कार्याला हातभार लावला, तर समाजातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही आणि एकही निराधार वृद्ध प्रेमाविना राहणार नाही. ही संस्था केवळ मदत करत नाही, तर माणुसकी जपते, शिक्षणाला बळ देते आणि आशेचा दिवा पेटवत राहते.

बोधी वृक्ष जसा शतकानुशतके सावली देत राहतो, तसाच हा "बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन" नावाचा सेवेचा वटवृक्ष गेली चौदा वर्षे हजारो आयुष्यांना आधार, शिक्षण आणि सन्मान देत आहे.

"समाजात देव शोधण्यापेक्षा, गरजूंना आधार देणाऱ्या हातांत देव दिसतो... आणि असे हात म्हणजेच बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशन."

**लेखक**
**ऋत्विक वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8421141104**

## भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिला क्रांतिकारकांचे योगदान : "राष्ट्रनिर्मितीतील शौर्य, त्याग आणि प्रेरणेचा अमर इतिहास"



भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिला क्रांतिकारकांचे योगदान हा आपल्या इतिहासातील अत्यंत सुवर्ण आणि अभिमानास्पद अध्याय आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी केवळ पुरुषांनीच नव्हे, तर शेकडो महिलांनीही आपल्या घरादाराचा त्याग करून, हातात शस्त्रे घेऊन आणि प्राणांची आहुती देऊन ब्रिटिश सत्तेला हादरवून सोडले होते. भारतीय स्वातंत्र्य संग्राम हा केवळ पुरुषांचा लढा नव्हता, तर तो संपूर्ण भारतीय समाजाचा सामूहिक संघर्ष होता. या महान स्वातंत्र्यलढ्यात महिलांनीही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. काहींनी हातात शस्त्र घेतले, काहींनी गुप्त क्रांतिकारकांना मदत केली, काहींनी सत्याग्रह, आंदोलन आणि जनजागृतीत सहभाग घेतला, तर काहींनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या धैर्य, त्याग आणि देशप्रेमामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा आणि दिशा मिळाली.सन १८५७ च्या स्वातंत्र्यसमरापासून महिलांच्या योगदानाची गौरवशाली परंपरा सुरू झाली. राणी लक्ष्मीबाई यांनी इंग्रजांविरुद्ध अतुलनीय शौर्याने युद्ध केले. "मी माझी झाशी देणार नाही" या निर्धाराने त्यांनी रणांगणात लढत वीरमरण पत्करले. त्यांचे धैर्य आजही भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे.क्रांतिकारक चळवळीत भीकाजी कामा यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी परदेशात भारताच्या स्वातंत्र्याचा प्रचार केला आणि १९०७ मध्ये जर्मनीतील स्टुटगार्ट येथे भारतीय राष्ट्रध्वज फडकावून भारताच्या स्वातंत्र्याची मागणी जगासमोर मांडली. त्यांना भारतीय राष्ट्रवादाच्या अग्रदूतांपैकी एक मानले जाते. प्रीतीलता वाडेदार यांनी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र लढ्यात सक्रिय सहभाग घेतला. शत्रूच्या ताब्यात जाण्यापेक्षा त्यांनी विष प्राशन करून बलिदान दिले. त्याचप्रमाणे कल्पना दत्त यांनी चिटगाव शस्त्रागार लुटीच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली.दुर्गा भाभी यांनी क्रांतिकारकांना आश्रय देणे, शस्त्रे पोहोचविणे आणि ब्रिटिश पोलिसांना चकवा देण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घातला. त्यांनी भगत सिंह यांना ब्रिटिशांच्या नजरेतून सुरक्षित बाहेर काढण्यात मोलाची मदत केली. स्वातंत्र्यलढ्यातील अहिंसात्मक आंदोलनातही महिलांचा मोठा सहभाग होता. सरोजिनी नायडू यांनी असहकार, सविनय कायदेभंग आणि भारत छोडो आंदोलनात नेतृत्व केले. त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या भारतीय महिला अध्यक्षा ठरल्या. अरुणा आसफ अली यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकावून स्वातंत्र्यलढ्याला नवी प्रेरणा दिली. उषा मेहता यांनी गुप्त 'काँग्रेस रेडिओ' सुरू करून ब्रिटिश सेन्सॉरशिपला धक्का दिला. या रेडिओद्वारे स्वातंत्र्य चळवळीचे संदेश देशभर पोहोचवले गेले. कस्तुरबा गांधी यांनीही सत्याग्रहात सक्रिय सहभाग घेत अनेक वेळा तुरुंगवास भोगला. महिलांनी केवळ आंदोलनच केले नाही, तर समाजात स्वातंत्र्य, शिक्षण, स्वाभिमान आणि समानतेची जाणीव निर्माण केली. त्यांनी जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या कार्यामुळे भारतीय महिलांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचे धैर्य आणि प्रेरणा मिळाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील या महिला केवळ साहाय्यक नव्हत्या, तर त्या स्वतः धोरणकर्त्या, रणधुरंधर आणि मार्गदर्शक होत्या. त्यांच्या या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. आजच्या आधुनिक युगातही या क्रांतिकारी माता-भगिनींचा इतिहास नवीन पिढीला सदैव राष्ट्रप्रेमाची आणि हक्कासाठी लढण्याची प्रेरणा देत राहील.आज स्वतंत्र भारतात महिलांचे शिक्षण, राजकारण, प्रशासन, संरक्षण, विज्ञान, क्रीडा आणि उद्योग क्षेत्रातील यश हे त्या क्रांतिकारक महिलांच्या संघर्षाचे फलित आहे. त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवणे आणि त्यांच्या आदर्शांवर चालणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिला क्रांतिकारकांचे योगदान अमूल्य, अद्वितीय आणि चिरस्मरणीय आहे. त्यांनी आपल्या धैर्य, त्याग, राष्ट्रनिष्ठा आणि आत्मबलिदानाने भारताच्या स्वातंत्र्याचा पाया अधिक भक्कम केला. त्यांच्या कार्याचा इतिहास हा प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या राष्ट्रसेवेच्या आदर्शांचा वारसा पुढे नेणे हेच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**प्रा. नवनाथ बी. बांगर**
**(ब्ल्यू व्हॅली इंग्लिश स्कूल,बिडकीन, छत्रपती संभाजीनगर)**

## एलोरा इंग्लिश स्कूलमध्ये ईव्हीएमद्वारे विद्यार्थी संसद निवडणूक

### श्रेयस धुतराज हेड बॉय, निरमा चौधरी हेड गर्ल




**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** बीड बायपासवरील खडी रोड येथील एलोरा इंग्लिश हायस्कूल व सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी संसद निवडणूक लोकशाही पद्धतीने आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या (ईव्हीएम) माध्यमातून उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्याने मतदानासाठी एकूण सहा मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती.

निवडणूक प्रक्रियेसाठी हरजीतकौर सोधी आणि निलाक्षी राव यांनी निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. मतदानानंतर मतमोजणी करून विविध वर्गांतील विद्यार्थी प्रतिनिधींची घोषणा करण्यात आली.

संस्थेचे सचिव प्रल्हाद शिंदे व मुख्याध्यापिका संगीता शिंदे यांनी विजयी विद्यार्थी प्रतिनिधींना बॅज लावून अभिनंदन केले. तसेच लोकशाही मूल्ये, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी अशा निवडणुकांचे महत्त्व अधोरेखित केले. यंदाच्या विद्यार्थी संसदेसाठी इयत्ता दहावीतील श्रेयस धुतराज याची हेड बॉय, तर निरमा चौधरी हिची हेड गर्ल म्हणून निवड करण्यात आली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–2026

### कर्जमुक्ती योजनेसाठी शेतकऱ्यांना तातडीने सहकार्य करा; बँकांना जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**हिंदु प्रकाशवार्ता /प्रतिनिधी**



**परभणी, :** परभणी जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ प्रभावीपणे राबविण्यात येत असून सर्व राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण व सहकारी बँकांनी आपल्या पात्र खातेदार शेतकऱ्यांची आधार माहिती अद्ययावत करणे, पोर्टलवरील माहिती अचूकरीत्या अपलोड करणे, ॲग्रीस्टॅक नोंदणी व आधार प्रमाणीकरणाबाबत मार्गदर्शन करणे तसेच आवश्यक ती सर्व मदत पात्र शेतकऱ्यांना तातडीने उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

बँक अधिकारी व प्रतिनिधींची आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीस जिल्हा उपनिबंधक श्री.जगदाळे, वित्तीय सल्लागार सुनील हट्टेकर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत परभणी जिल्ह्यातील १,६०,७६९ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, त्यापैकी ७९,८५५ पात्र शेतकऱ्यांना सुमारे ₹५८२ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांचा समावेश पुढील यादीमध्ये करण्यात येणार असून त्यांनाही योजनेचा लाभ दिला जाईल.

योजनेअंतर्गत पात्र लाभाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. यासाठी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व ॲग्रीस्टॅक (AgriStack) नोंदणी अनिवार्य आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी.

राज्य शासन व राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार NPA तसेच Overdue (Non-NPA) खात्यांसाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. पात्र रक्कम शासनामार्फत DBT द्वारे जमा करण्यात येईल, तर शासनाच्या निर्णयानुसार आवश्यक त्या प्रकरणांमध्ये संबंधित बँकांकडून उर्वरित रकमेचा त्याग (Sacrifice) करण्यात येईल. ₹२ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या पात्र खात्यांमध्ये शेतकऱ्यांनी शासनाने निर्धारित केलेली स्वतःची रक्कम प्रथम जमा करणे आवश्यक राहील. संबंधित खात्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन बँकांकडून उपलब्ध करून दिले जाईल.

योजनेअंतर्गत पात्र खात्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित बँकांनी पात्र शेतकऱ्यांना तात्काळ नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा स्पष्ट सूचना राज्यस्तरीय बँकर्स समितीने सर्व बँकांना दिल्या आहेत. तसेच, शासनाच्या निर्णयानुसार वेळेत पीककर्जाची परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ₹५०,००० पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक कार्यवाही संबंधित बँकांमार्फत करण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत, खासगी, ग्रामीण व सहकारी बँकांनी आपल्या पात्र खातेदार शेतकऱ्यांची आधार माहिती अद्ययावत करणे, पोर्टलवरील माहिती अचूकरीत्या अपलोड करणे, ॲग्रीस्टॅक नोंदणी व आधार प्रमाणीकरणाबाबत मार्गदर्शन करणे तसेच आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

सर्व महा-ई-सेवा केंद्रे (Maha e-Seva Kendra) व कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) यांनी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्णपणे विनामूल्य करून द्यावी. या सेवांसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारू नये. शुल्क आकारल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

E-kyc -४९२०४ शेतकऱ्यांनी करून घेतलेले नाही त्यांनी ई - के वायसी तत्काळ करून घ्यावी. ९२६६ शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आय डी / ॲग्रीस्टॅक काढलेला नाही ते तत्काळ काढून घ्यावे.

योजनेसंदर्भात अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी तसेच संबंधित तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा.

परभणी जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## डॉक्टर शकील शेख यांची राष्ट्रीय महात्मा गांधी रिसर्च फेलोशिपसाठी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान (National Institute of Naturopathy), पुणे यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय महात्मा गांधी रिसर्च फेलोशिपसाठी छत्रपती संभाजीनगरातील (बायजीपुरा) डॉ. शकील शेख यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.

ही निवड अत्यंत मानाची समजली जात असून यावर्षी संपूर्ण भारतातून केवळ १५ संशोधकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये डॉ. शकील शेख यांचा समावेश झाल्याने छत्रपती संभाजीनगरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान, पुणेचे संचालक डॉ. अमरेंद्र सिंह, ज्येष्ठ संशोधक प्रा. डॉ. आर. के. मुटाटकर आणि डॉ. नैना आठल्ये यांच्या निवड समितीने देशभरातील अर्जांची छाननी करून ही निवड जाहीर केली. डॉ. शकील शेख हे "नॅचरोपॅथी अँड मेडिटेशन फॉर होलेस्टिक हेल्थ एज्युकेशन" (सर्वांगीण आरोग्य शिक्षणासाठी ध्यान साधना) या महत्त्वपूर्ण संशोधन विषयावर काम करणार आहेत. या संशोधनामध्ये ध्यान, योग, नैसर्गिक जीवनशैली आणि मानसिक आरोग्य यांचा व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम अभ्यासला जाणार आहे. या संशोधनाद्वारे विद्यार्थी, युवक, शिक्षक, आरोग्य कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये ध्यान व नैसर्गिक आरोग्य पद्धतींचा प्रसार करून तणावमुक्त, निरोगी आणि संतुलित जीवनशैली निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आधुनिक धकाधकीच्या जीवनात वाढणारा ताण, नैराश्य, चिंता आणि जीवनशैलीजन्य आजार यावर ध्यानाचे वैज्ञानिकदृष्ट्या होणारे फायदे अभ्यासून त्याचे शैक्षणिक आणि सामाजिक स्तरावर उपयुक्त मॉडेल विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. यावेळी डॉ. शकील शेख यांनी सांगितले की, "संपूर्ण भारतातून केवळ १५ जणांची निवड करण्यात आली असून या प्रतिष्ठित फेलोशिपसाठी माझी निवड होणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. या संशोधनाच्या माध्यमातून ध्यान आणि नैसर्गिक आरोग्य शिक्षणाचा अधिकाधिक लोकांपर्यंत प्रसार करण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्य करणार आहे." डॉ. शकील शेख यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली सोयगाव येथील नागरिकांच्या तक्रार निवारण व आढावा बैठक संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी





**सोयगाव,दि.३ ऑगस्ट :** आमदार अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून व अध्यक्षतेखाली सोयगाव येथील पंचायत समिती व तहसील कार्यालयात लोकसंपर्क अभियानांतर्गत नागरिकांच्या तक्रार निवारण व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.यावेळी नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची सुनावणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.

तहसील कार्यालयातील बैठकीत आमदार अब्दुल सत्तार यांनी फेरफार, वारस नोंद, नामांतरण, ७/१२ दुरुस्ती, ई-पीक पाहणी,पीकविमा,नैसर्गिक आपत्ती पंचनामे,महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे,शासकीय जमिनीवरील अतिक्रमण,गौण खनिजांची अवैध वाहतूक,जात,उत्पन्न व रहिवासी दाखल्यांसह सर्व महसूल विषयक प्रकरणांचा कालबद्ध निपटारा करण्याचे आदेश दिले.

आजच्या बैठकीत प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर वेळेत कार्यवाही करून अर्जदाराला त्याची माहिती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.तसेच पाणंद रस्त्यांबाबतचे तिढे तातडीने सोडवून कामे सुरू करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.पंचायत समिती कार्यालयातील बैठकीत घरकुल,विहीर,रोजगार हमी योजनेसह विविध योजनांमध्ये लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी होत. असल्याच्या तक्रारी गंभीर असल्याचे सांगत अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही,असा इशारा त्यांनी दिला. पात्र लाभार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत लाभापासून वंचित ठेवू नये,नागरिकांच्या अर्जांचा निश्चित कालमर्यादेत निपटारा करावा,ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामांना गती द्यावी तसेच पिण्याचे पाणी,रस्ते,स्वच्छता,घरकुल, शौचालय व रोजगार हमी यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार म्हणाले,जनतेची कामे हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचल्या पाहिजेत. नागरिकांना न्याय,सन्मान आणि वेळेत सेवा मिळाली पाहिजे.कामात दिरंगाई,हलगर्जीपणा किंवा भ्रष्टाचार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने काम करून जनतेचा विश्वास जपावा.

- प्रलंबित देयकांबाबत रोहयो मंत्री भारत गोगावले यांची भेट घेणार

बैठकीदरम्यान वैयक्तिक सिंचन विहीर,गाय गोठा तसेच शासनाच्या विविध योजनांतील कुशल व अकुशल कामांची प्रलंबित देयके याबाबत अनेक नागरिकांनी आमदार अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रारी मांडल्या.याची गंभीर दखल घेत, संबंधित मंत्री ना.भरत गोगावले यांची भेट घेवून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करू अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.

यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रत्येक तक्रारदाराशी वैयक्तिक संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा केला जाईल,असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत अनेक नागरिकांनी रेशनचा नियमित लाभ मिळत नसल्याची तक्रार मांडली. याची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना रेशनचा लाभ मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

तसेच सिल्लोड - सोयगाव तालुक्यासाठी वाढीव रेशन इष्टांक मंजूर व्हावा यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

बैठकीस तहसीलदार मनीषा मेने,गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड,सहाय्यक गटविकास अधिकारी अमोल जगताप,नायब तहसीलदार तथा नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी संभाजी देशमुख, बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता राजेश राजगुरू, सिंचन विभागाच्या उपविभागीय अधिकारी रुचिका घोगरे, तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.जितेश जावळे,महिला व बाल विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर, गटशिक्षणाधिकारी अक्षय धांदर,शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंह चव्हाण,सिल्लोड तालुकाप्रमुख केशवराव तायडे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दारासिंग चव्हाण,शिवप्पा चोपडे,सोपान गावंडे,युवासेना पदाधिकारी कुणाल राजपूत, नगरपंचायतीतील शिवसेना गटनेते अक्षय काळे,नगरसेवक राजू दुतोंडे,स्वप्निल पाटील,शहरप्रमुख संतोष बोडखे,हर्षल काळे,कादिर शहा,सलीम पठाण, आदी उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय रसायनशास्त्र दिन उत्साहात साजरा



हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**सोयगाव,दि.३ ऑगस्ट :** अजिंठा एज्युकेशन सोसायटी संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय रसायनशास्त्र दिन-२०२६ उत्साहपूर्ण वातावरणात महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे उपस्थित होते.कार्यक्रमाचे संसाधन व्यक्ती (Resource Person) म्हणून रसायनशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष पडघन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास डॉ.सुनील चौधरे,प्रा.रवींद्र जाधव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मनोजकुमार चोपडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.पंकज गावित यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. आपल्या व्याख्यानात डॉ.पडघन यांनी रसायनशास्त्राचे दैनंदिन जीवनातील महत्त्व,आधुनिक संशोधन,हरित रसायनशास्त्र,औषधनिर्मिती,पर्यावरण संवर्धन तसेच रोजगार आणि उद्योजकतेच्या विविध संधी यांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच भारतातील महान वैज्ञानिक आचार्य प्रफुल्ल चंद्र रे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ विचारसरणी स्वीकारून संशोधन क्षेत्रात कार्य करावे,असे प्रतिपादन केले.प्रमुख पाहुणे डॉ.रावसाहेब बारोटे यांनी राष्ट्रीय रसायनशास्त्र दिनाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना नवोपक्रम आणि संशोधनासाठी प्रेरित केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. रामेश्वर मगर यांनी केले.

# उरण महाविद्यालयात आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक स्मृतिदिन साजरा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक स्मृतिदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. लेखन प्रेरणा दिन म्हणून आजचा दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमधे वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.प्राचार्यांनी यावेळी महापुरुषांच्या चरित्र ग्रंथांचे वाचन करून आपण त्यांचे विचार समजून घेतले पाहिजे असे प्रतिपादन केले. डॉ. ए. के.गायकवाड (भूगोल विभाग प्रमुख ) यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या चरित्रावर प्रकाश टाकताना फकीरा, वैजयंता या कादंबरीतील अन्यायाविरुद्धचा लढा विद्यार्थ्यांना सांगितला. तर डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाविषयी भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. अनुपमा कांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात डॉ. ए.आर. चव्हाण, डॉ. एच. के. जगताप,प्रा. विनिता तांडेल, प्रा.पूजा गुप्ता, प्रा.दिपू यादव, प्रा.हन्नत शेख तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# परदेश अभ्यास दौरा योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, :** राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी व शेतीत नाविन्यपूर्ण तंत्रांचा अवलंब करता यावा, यासाठी राबविण्यात येणाऱ्या देशाबाहेरील अभ्यास दौरे – राज्य पुरस्कृत योजना (सन २०२६-२७) अंतर्गत परभणी जिल्ह्यास ५ शेतकऱ्यांचा लक्षांक प्राप्त झाला आहे. या योजनेसाठी इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी दि. १३ ऑगस्ट २०२६ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त प्रस्तावांमधून सोडत पद्धतीने व ज्येष्ठता यादीनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. निवड प्रक्रियेत किमान एक महिला शेतकरी तसेच किमान एक केंद्र अथवा राज्य कृषी पुरस्कारप्राप्त किंवा पीक स्पर्धा विजेता शेतकरी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

या अभ्यास दौऱ्यासाठी युरोप तसेच चीन या देशांची निवड करण्यात आली आहे. युरोपमध्ये फलोत्पादन, सेंद्रिय शेती व दुग्धोत्पादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करता येणार असून, चीनमध्ये विविध कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढीसाठीची आधुनिक साधने व कृषी प्रदर्शनांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार स्वतः शेतकरी असणे, त्याच्या नावावर अद्ययावत ७/१२ व ८-अ उतारा, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, वैध पासपोर्ट, आधार कार्ड, शिधापत्रिका, तसेच एमबीबीएस डॉक्टरांचे शारीरिक तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय दौऱ्याच्या दिवशी किमान २५ वर्षे पूर्ण असावे. तसेच अर्जदार शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खासगी सेवेत नसावा तसेच यापूर्वी शासनाच्या अर्थसहाय्याने विदेश अभ्यास दौरा केलेला नसावा.

इच्छुक शेतकऱ्यांनी कृषी आयुक्तालयाने निर्धारित केलेले प्रपत्र क्रमांक १, २, ३ व ५ परिपूर्ण भरून, सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत. शेतकरी निवडीचे अंतिम अधिकार राज्यस्तरीय समितीकडे राखीव असून, पात्र शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, परभणी यांनी केले आहे.

# केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी घेतले श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शन



खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ येथे वस्त्र उद्योग छत्रपती संभाजीनगरच्या कार्यक्रमासाठी वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह हे आले असता त्यांनी आज श्री क्षेत्र वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर महादेवाचे दर्शन घेतले व प पु महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरिजी महाराज यांची भेट व दर्शन घेतले यावेळी भाजपा जिल्हा शहराध्यक्ष किशोर शितोळे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,जिल्हा सचिव गणेश हजारी, विकास कापसे, मंदिर प्रशासन चे कार्यकारी विस्वस्थ योगेश टोपरे, राजेंद्र कौशिके, नरेश टोपरे, सुनील शुक्ल महेश अग्निहोत्री, सागर मातकर व इतर कार्यकर्ते उपस्थित होते

# लायन्स क्लब–गोल्डचा 19 वा पदग्रहण सोहळा उत्साहात; आशिष छाबडा यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर–गोल्ड (डिस्ट्रिक्ट ३२३४ एच-२) चा १९ वा पदग्रहण (इन्स्टॉलेशन) सोहळा चिकलठाणा येथील खिवंसरा बिझनेस सेंटरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. लायनिस्टिक वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्ष म्हणून लायन आशिष छाबडा, सचिव म्हणून लायन सुनील पांडे आणि कोषाध्यक्ष म्हणून लायन राजेंद्र ठोले यांनी पदभार स्वीकारला.

प्रथम उपाध्यक्ष लायन सुबोध जाधव, द्वितीय उपाध्यक्ष लायन आनंद भागेरिया, सहसचिव लायन किरण पाटणी, सहकोषाध्यक्ष लायन महेंद्र रावका तसेच संचालक मंडळातील सदस्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला एमजेएफ लायन प्रवीण काला, एमजेएफ लायन मनोज गंगवाल, डॉ. अमोल पाथ्रीकर, लायन राहुल दशरथे, प्रसाद पाटणी, अक्षय सावजी, राजेश अग्रवाल, सतनामसिंग गुलाटी, मनोज अंभोरे, मयूर सोनावणे, मृगांक लेंभे, किशोर रावका, पवन मुगदिया, अभिजित हिरप, रंजीत ऊरगुंडे, सीए अमोल गोधा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन लायन सीमा रावका व लायन पूजा गोधा यांनी केले. सूत्रसंचालन लायन रचना दशरथे आणि लायन राहुल दशरथे यांनी केले.

सोहळ्याचे प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पीएमजेएफ लायन दत्तात्रय औसेकर होते. पदग्रहण अधिकारी म्हणून माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन एमजेएफ लायन सुनील देसरडा यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शपथ दिली, तर रिजन चेअरमन एमजेएफ लायन किशोर ललवाणी यांनी नवीन सदस्यांचा क्लबमध्ये समावेश केला.

# अमली पदार्थांच्या विरोधात कडक कारवाईचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.



**परभणी :** जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वापराला आळा घालण्यासाठी पोलीस विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तपणे कठोर व सातत्यपूर्ण कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

जिल्हास्तरीय नार्को-कोऑर्डिनेशन समितीच्या बैठकीत त्यांनी संबंधित विभागांना प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्याचे सांगितले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांच्यासह पोलीस, आरोग्य, शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क आणि डाक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अमली पदार्थांचा वापर हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचे नव्हे, तर समाजाच्या आरोग्याशी निगडित गंभीर आव्हान असल्याचे नमूद करत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यातंर्गत दाखल गुन्हे, जप्तीची कारवाई आणि प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच संवेदनशील भागांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबविणे, पानटपऱ्यांवर नियमित तपासणी करणे, औषधांचा गैरवापर रोखण्यासाठी औषध विक्री केंद्रांची काटेकोर पाहणी करणे आणि संशयास्पद प्रकरणांमध्ये पोलीस व अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तपणे तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. शाळा व महाविद्यालयांच्या आवारात तसेच १०० मीटर परिसरातील पानटपऱ्यांची नियमित तपासणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. तंबाखूजन्य पदार्थ, प्रतिबंधित वस्तू किंवा संशयास्पद विक्री आढळल्यास संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधातील मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्कता, समन्वय आणि कठोर अंमलबजावणीवर भर द्यावा, असेही जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# या सुखानो या....' च्या सुरांनी रसिक भारावले

## संगीतकार सुधीर फडके यांच्या जयंतीनिमित्त मैफल रंगली



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** 'या सुखानो या... एकटी पथ चालले...', 'तिन्ही लोक आनंदाने भरून गाऊ दे रे, तुझे गीत गाण्यासाठी सूर लावुंदे रे...' अशा एकापेक्षा एक अजरामर गीतांच्या सादरीकरणाने रविवारी, २ ऑगस्ट रोजी शहरवासीय स्वरमाधुऱ्यात न्हाऊन निघाले. निमित्त होते थोर संगीतकार आणि गायक सुधीर फडके यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'तुझे गीत गाण्यासाठी...' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे. साहित्य संगीत कला मंचच्या वतीने जीवन विकास ग्रंथालयाच्या ग्रंथमित्र भा. ब. आर्वीकर सभागृहात या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

सलग चौथ्या वर्षी बाबूजींची जयंती त्यांच्याच गाण्यांच्या सादरीकरणातून साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. सभागृह खच्चून भरल्याने अनेक रसिकांनी बाहेर बसूनही स्वरमैफलीचा आनंद लुटला. गीत, वाद्य आणि सुरांच्या संगमाने रसिकांना एक प्रकारची शांत समाधी लागल्याचा प्रत्यय यावेळी आला.

या मैफलीत गायक वैभव पांडे आणि गायिका वर्षा जोशी यांनी बाबूजींच्या गीतांचे अत्यंत सुरेल आणि भावपूर्ण गायन करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांना संवादिनी मिलिंद डोलारे, तबला गजानन धुमाळ, व्हायोलिन प्रबोध जोशी, सतार अतुल देशपांडे, बोलवाद्य श्रीकांत उमरीकर या कलाकारांची साथसंगत मिळाली.

**त्रिकुटाची आठवण:** या मैफलीत सुमन कल्याणपूर यांचे 'कशी करू सांगता', आशा भोसले यांच्या आवाजातील 'या सुखानो या', 'तुझे गीत गाण्यासाठी', 'त्या तरुतली विसरले गीत', 'हृदय रिकामे घेऊन फिरतो' गाणी सादर झाली. यावेळी विशेष आठवण जागवली गेली ती ग. दि. माडगूळकर (लेखन), सुधीर फडके (संगीत) आणि आशा भोसले (गायन) या त्रिकुटाची. त्रिकुटाने साकारलेले 'हृदयी प्रीत जागते जाणता अजाणता' हे गीत सादर झाले.

# जिंतूर तालुक्यात अपुऱ्या पावसाने खरीप धोक्यात; उत्पादन घटीची शक्यता

## तालुक्यातील एकूण पेरणीयोग्य क्षेत्र 102333 हे. असून त्यापैकी आतापर्यंत 69297 हे. क्षेत्रावर खरीप पेरणी

हिंदू प्रकाशवार्ता | सचिन रायपत्रीवार



**जिंतूर :** जिंतूर तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या अत्यल्प व असमाधानकारक पावसामुळे खरीप पिकांची परिस्थिती गंभीर बनली आहे. जून महिन्यात झालेल्या अल्प पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या पूर्ण केल्या; मात्र जुलै महिन्यात दि. 30/07/2026 अखेर केवळ 142 मि.मी. पावसाची नोंद झाल्याने कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, तूर व हळद या पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला आहे. पावसाअभावी यंदा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

तालुक्यातील एकूण पेरणीयोग्य क्षेत्र 102333 हे. असून त्यापैकी आतापर्यंत 69297 हे. क्षेत्रावर खरीप पेरणी झाली आहे. ऊन व कोरड्या वाऱ्यांमुळे पिकांची वाढ खुंटत असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

कापूस या पिकाचे सरासरी पेरणी क्षेत्र 28877.6 हे. असून 21320 हे. क्षेत्रावर लागवड झाली आहे. सोयाबीनचे सरासरी क्षेत्र 48492 हे. असून 39890 हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. दोन्ही पिके वाढीच्या अवस्थेत असली तरी अपुऱ्या पावसाचा त्यांच्यावर मोठा परिणाम होत आहे.

मूग या पिकाचे सरासरी क्षेत्र 5869.6 हे. असून 1178.2 हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. उडीदचे सरासरी क्षेत्र 3551 हे. असून 764.2 हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. तर तूरचे सरासरी क्षेत्र 12204 हे. असून 6252 हे. क्षेत्रावर पेरणी झाली आहे. तसेच हळद पिकाची 1680 क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. या सर्व पिकांवर कमी पावसाचा प्रतिकूल परिणाम होत असून वाढ खुंटल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

कृषी विभागाच्या अहवालानुसार, खरीप पिकांच्या सुदृढ वाढीसाठी तातडीने समाधानकारक पावसाची आवश्यकता असून, सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे.

# क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सावकाराच्या जाचातून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी लढा उभा केला : प्रा. राम बाहेती



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सावकाराच्या जाचातून शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी लढा उभा केला. कष्टकरी, उपेक्षित, वंचित, असंघटित कामगार, श्रमिक, मजूर यांच्यासाठी जीवनभर लढले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालवली, असे प्रतिपादन प्रा. कॉ. राम बाहेती यांनी येथे केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सी. एस.पाटील होत्या. पाहुण्यांच्या हस्ते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

प्रा. कॉ. राम बाहेती पुढे म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील थोर क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात बंड पुकारले होते. क्रांतीसिंह हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होते. स्वातंत्र्याचा लढा देत असतानाच पत्रिसरकार चालवले. भूमिहीन लढा लढला, शेतमजूर लढा किसान आंदोलनाच्या माध्यमातून देशभर चालविला. सातारा व बीड येथून खासदार झाले. संसदेत ही लढत होते. सामान्य जीवन जगून त्याग आणि समर्पण दिले. सत्यशोधकी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता, असे बाहेती म्हणाले.

प्राचार्य पाटील म्हणाले, क्रांतीसिंह नाना पाटील यांचा आदर्श नव्या पिढीने घेतला पाहिजे. महान व्यक्तीचे जीवन आपल्याला प्रेरणा देत असते. क्रांतिसिंह यांचा जीवन परिचय व त्यांच्या कार्याची ओळख व वेगळेपण सांगितले. सामान्य परिस्थितीतून आलेले क्रांतीसिंह गरीब, उपेक्षित माणसांचे जीवन वास्तव स्वरूपात लढ्यातून मांडले. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढा देणे, विषमतेला नकार देणे आणि मानवता वादाची पूजा करणे असे नायक क्रांतीसिंह होते.

मंचावर उपप्राचार्य प्रा.भरत वाहटुळे, डॉ. संगीता राजमाने, प्रा. आश्रुबा गवळी, प्रा. राहुल पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. भारत शिरसाट यांनी केले.

# जिल्हा स्तरीय कॅरम स्पर्धा उत्साहात संपन्न



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन व ओम साई कॅरम क्लब उरण यांच्या सहयोगाने द्रोणागिरी देवी मंदिर सभागृह करंजा उरण येथे १ व २ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन केले होते स्पर्धेसाठी जिल्ह्यातील ११२ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला होता.स्पर्धेचे उदघाटन रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी केले.

स्पर्धेसाठी दोन दिवस जेवणाची व्यवस्था भाजपा शहर अध्यक्ष कौशिक शहा यांनी केली होती. सदर स्पर्धेस उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांनी भेट दिली.स्पर्धेत प्रथम क्रमांक मानव पटेल कामोठे,द्वितीय क्रमांक आशिष देशमाने पनवेल,तृतीय क्रमांक अश्रफ खान पनवेल व चतुर्थ क्रमांक राजेश गोहिल कामोठे यांनी मिळवला.सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे पदाधिकारी वैभव वाईगडे, वैभव पेठे, अमित यादव, विराज नाखवा, हरेश नाखवा, तेजस म्हात्रे, नितीन वाघेला, सर्व कॅरम क्लब च्या सभासदांनी प्रयत्न केले.

# "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त जिल्हाभर जनजागृती उपक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माननीय जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर व जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांच्या नियोजनाखाली दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जिल्हाभर जागतिक स्तनपान सप्ताह विविध जनजागृती उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येत आहे.

"स्तनपान ही नवजात शिशुसाठी अमृततुल्य देणगी आहे." नवजात बालकाच्या निरोगी, सुदृढ आणि सुरक्षित आयुष्याची भक्कम पायाभरणी आईच्या दुधातूनच होते. जन्मानंतरच्या पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करणे तसेच जन्मापासून पहिल्या सहा महिन्यांपर्यंत केवळ आईचे दूध (Exclusive Breast-feeding) देणे हे बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. आईच्या दुधामुळे बालकाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते,



संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते तसेच शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते.

**यावर्षीच्या जागतिक स्तनपान सप्ताहाची "शाश्वत जीवनाच्या सुरुवातीसाठी स्तनपान : जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करा" (Breastfeeding for a Sustainable Start in Life:** Strengthen What Works) ही संकल्पना असून, स्तनपानाच्या प्रभावी पद्धती अधिक सक्षम करून प्रत्येक नवजात बालकाला आयुष्याची सर्वोत्तम सुरुवात मिळावी हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यासोबतच ९ ते ५९ महिन्यांपर्यंतच्या बालकांना जीवनसत्त्व 'अ' (Vitamin-A) पूरक आहार देण्याबाबतही व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

या सप्ताहानिमित्त जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुष्मान आरोग्य मंदिरे तसेच गावपातळीवर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांचे पुनर्प्रशिक्षण, गर्भवती व स्तनदा मातांसाठी समुपदेशन सत्रे, स्तनपान विषयक कार्यशाळा, माता-पालक बैठका, शालेय स्तरावरील प्रश्नमंजुषा, निबंध व चित्रकला स्पर्धा तसेच स्तनपानास पोषक वातावरण निर्मितीचे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

याशिवाय आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच महिला व बाल विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून गृहभेटी, नियमित लसीकरण सत्रे, व्हिलेज हेल्थ, सॅनिटेशन अँड न्यूट्रिशन डे (VHND) कार्यक्रम तसेच गावपातळीवरील समुपदेशनाद्वारे स्तनपान, शिशुपोषण, पूरक आहार, स्वच्छता आणि माता-बाल आरोग्याविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

"माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानाच्या माध्यमातून माता व बाल आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग व महिला व बाल विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा सप्ताह प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सर्व गर्भवती महिला, स्तनदा माता व त्यांच्या कुटुंबीयांनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन "आईचे दूध – बाळासाठी सर्वोत्तम अन्न" हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे..

# दोन महिन्यांच्या अथक उपचारांनी घाटीत विषबाधाग्रस्त 27 वर्षीय तरुणाला नवजीवन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विषारी ऑर्गनोफॉस्फेट रसायनाच्या तीव्र विषबाधेमुळे मृत्यूच्या दारात पोहोचलेल्या २७ वर्षीय अमोल ज्ञानेश्वर फुलारे याला घाटी रुग्णालयातील डॉक्टरांनी तब्बल ५० दिवस अतिदक्षता विभागात उपचार करून नवजीवन दिले. १० जून रोजी अत्यंत गंभीर अवस्थेत दाखल झालेल्या अमोलला श्वास घेण्यास अडचण निर्माण झाल्याने तातडीने व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले.

उपचारादरम्यान त्याला 'ऑर्गनोफॉस्फेट इंड्युस्ड न्यूरोपॅथी'मुळे श्वसनासाठी गळ्यात शस्त्रक्रियेद्वारे नळी बसवावी लागली. त्यानंतर व्हेंटिलेटरवर असताना न्यूमोनियाचा संसर्गही झाला. मात्र उच्च दर्जाची प्रतिजैविके, नेब्युलायझेशन आणि सातत्यपूर्ण उपचारांमुळे डॉक्टरांनी संसर्गावर नियंत्रण मिळवले.

अखेर ५० दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर अमोलची प्रकृती सुधारली. गळ्यातील नळी यशस्वीरीत्या काढण्यात आली असून तो पूर्णपणे धोक्याबाहेर आहे. सोमवारी (३ ऑगस्ट) त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली पथकप्रमुख डॉ. ममता मुळे, डॉ. मिलिंद तारू, डॉ. सुरेश कबळे तसेच डॉ. प्रियांका, डॉ. संदीप, डॉ. विकास, सागर, धम्मरक्षिता आणि परिचारिका संवर्गाने हे उपचार यशस्वी केले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अमोलच्या कुटुंबीयांनी संपूर्ण वैद्यकीय पथकाचे मनःपूर्वक आभार मानले.

# थॅलेसिमियामुक्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा संकल्प करूया : डॉ. अपर्णा जक्कल

## जनजागृतीसाठी जनकल्याण समिती व दत्ताजी भाले रक्तकेंद्राचा पुढाकार; कार्यशाळेत विविध उपाययोजनांची घोषणा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** थॅलेसिमिया आणि सिकलसेलसारख्या आनुवंशिक आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी व्यापक जनजागृती आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. प्रत्येकाच्या सहकार्याने छत्रपती संभाजीनगर जिल्हा थॅलेसिमियामुक्त करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन जिल्हा रुग्णालयाच्या शरीरविकृतीशास्त्र तज्ज्ञ (वर्ग-१) तथा रक्तपेढी अधिकारी डॉ. अपर्णा जक्कल यांनी केले.

हेडगेवार रुग्णालयातील दामुअण्णा दाते सभागृहात जनकल्याण समिती आणि दत्ताजी भाले रक्तकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसिमिया व सिकलसेल जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत डॉक्टर, सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच थॅलेसिमियाग्रस्त बालकांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. जक्कल यांनी सांगितले की, थॅलेसिमिया प्रतिबंधासाठी समाजात व्यापक जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. यासाठी वधू-वर परिचय मेळाव्यांमध्ये प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करण्यात येणार असून, युवकांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियावरील रील्स आणि लघुपटांचा वापर केला जाणार आहे. ग्रामीण भागात हरिनाम सप्ताह, भागवत कथा, यात्रा आदी धार्मिक-सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही जनजागृतीचा संदेश दिला जाणार आहे.

याशिवाय स्त्रीरोगतज्ज्ञांच्या माध्यमातून गर्भवती महिलांचे नियमित समुपदेशन, नोकरीपूर्व आरोग्य तपासणी तसेच महाविद्यालयीन प्रवेशावेळी थॅलेसिमिया चाचणीचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. प्रवीण वक्ते यांच्या हस्ते झाले. यावेळी जनकल्याण समितीचे विश्वस्त डॉ. अनंत पंढरे, दत्ताजी भाले रक्तकेंद्राच्या डॉ. मंजूषा कुलकर्णी, संचालक अमरसिंह सातपूते, पराग कंगले, डॉ. अमित पिलखाने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी थॅलेसिमियामुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे जनजागृती अभियान राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# ब्रिज भूषण सिंग यांच्या निर्दोष मुक्ततेचा निर्णय अत्यंत दुर्दैवी

## अखिल भारतीय जनवादी महिला संघटना महाराष्ट्र राज्य कमिटीने केली नाराजी व्यक्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** दिल्ली उच्च न्यायालयाने आज दिलेल्या निकालाद्वारे महिला कुस्तीगीरांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेले भाजपचे माजी खासदार ब्रिज भूषण शरण सिंग आणि सहआरोपी विनोद तोमर यांची निर्दोष मुक्तता केली. हा निर्णय अत्यंत दुर्दैवी असून महिला खेळाडूंना नाउमेद करणारा आणि अत्याचार करणाऱ्याना संजीवनी देणारा आहे, असे स्पष्ट मत अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कमिटीने व्यक्त केले आहे. सध्याच्या काळात इतर अनेक घटनात्मक संस्थाप्रमाणे प्रमाणे न्यायव्यवस्थेने सुद्धा आपले स्वातंत्र्य गमावले आहे की काय ही शंका या निकालाने बळावली आहे.

सर्व क्षेत्रांत, आणि त्यातही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी महिला खेळाडूंना त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांच्या तुलनेत प्रचंड सामाजिक आणि आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. शासन आणि न्यायव्यवस्थेने हे लक्षात घेतलेच पाहिजे. मात्र दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

मात्र त्याचबरोबर, या सर्व परिणामांची जाणीव असूनही हिमतीने आपल्यावरील लैंगिक अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्या साक्षी मलिक, विनेश फोगाट आणि त्यांच्या बाजूचे अखेरपर्यंत उभे राहणारे त्यांचे पुरुष सहकारी बजरंग पुनिया यांच्या धैर्याला जनवादी महिला संघटना सलाम करीत आहे. या सर्वांची लढाई वाया जाणार नाही. या लढाईतून प्रेरणा घेऊन अत्याचार पीडिता अधिक हिमतीने पुढे येतील, अशी खात्रीही आम्ही व्यक्त करीत आहोत. असे मत या अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. विनेश फोगाट हिने आपली लढाई सुरूच राहणार असल्याच्या केलेल्या व्यक्तव्याचेही आम्ही स्वागत करीत आहोत असे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेचे नसीमा शेख – राज्य अध्यक्ष ,प्राची हातिवलेकर – राज्य सचिव, हेमलता पाटील राज्य उपाध्यक्षा, सविता पाटील जिल्हा अध्यक्षा धनवंती भगत सेक्रेटरी, कुंदा पाटील सहसचिव लता पाटील, गीता पाटील रजनी पाटील, नयना म्हात्रे आदी महिला पदाधिकाऱ्यांनी न्यायायलयाच्या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

# लिम्फोमा कॅन्सरवर यशस्वी उपचार: 12 वर्षीय मुलीच्या प्रकृतीत अवघ्या 15 दिवसांत लक्षणीय सुधारणा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कॅन्सरचे वेळेत निदान आणि योग्य उपचार मिळाल्यास गंभीर अवस्थेतील रुग्णालाही नवजीवन मिळू शकते, याचे प्रभावी उदाहरण म्हणजे मूळ छत्रपती संभाजीनगर येथील १२ वर्षीय मुलीची उपचारयात्रा होय. त्या मुलीला लिम्फोमा या कॅन्सरचे निदान झाले होते. तसेच इतर आवश्यक वैद्यकीय तपासण्यांमधून लिम्फोमा कॅन्सरचे निदान निश्चित झाले होते.

कॅन्सरमुळे तिच्या छातीमध्ये सुमारे 87x115x 130mm. आकाराची मोठी गाठ निर्माण झाली होती. ही गाठ श्वसनमार्गावर दाब निर्माण करत असल्याने तिला श्वास घेण्यास अत्यंत त्रास होत होता. तिची प्रकृती दिवसेंदिवस गंभीर होत गेल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉ. आय. जी पटेल फाउंडेशन व सिल्वर लाईन हॉस्पिटल चे संचालक तसेच आयुर्वेद कॅन्सर तज्ञ डॉ. आय. जी. पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने सलग १५ दिवस अतिदक्षता विभाग मध्ये उपचार करण्यात आले. डॉ. आय. जी. पटेल( आयुर्वेद कॅन्सर तज्ञ) , व इतर डॉक्टर टीम यामध्ये डॉ. चांदेकर ( आय. सी. यु. तज्ञ), डॉ. आशिष हुके ( कर्करोग तज्ञ ), डॉ. समिना पटेल, डॉ. मेघा शेरकर, डॉ. सुमित दावणे,डॉ. सायली मोकाशे या सर्व टीमने २४ तास तिच्यावर बारकाईने लक्ष ठेवून उपचार केले.

योग्य निदान, नियोजनबद्ध उपचार आणि सातत्यपूर्ण वैद्यकीय देखरेखीमुळे अवघ्या १५ दिवसांत तिच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा दिसून आली. उपचारांनंतर छातीतील गाठ पूर्णपणे नाहीशी झाली, त्यामुळे श्वास घेण्यातील अडथळा दूर झाला आणि तिचा श्वासोच्छ्वास पूर्ववत झाला. आज इशरत स्वतः चालते, बोलते, जेवते, खेळते आणि दैनंदिन सर्व कामे सहजपणे करू शकते. तिच्या प्रकृतीतील हा सकारात्मक बदल कुटुंबीयांसाठी दिलासादायक ठरला.

# शिवना येथील इलेक्ट्रिकल दुकान फोडले; चार लाखांची तांब्याची तार लंपास, 'सीसीटीव्ही'त घटना कैद; व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील अजिंठा–बुलढाणा राज्य महामार्गालगत असलेल्या श्री साई इलेक्ट्रिकल्स दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे चार लाख रुपये किमतीची तांब्याची तार चोरून नेल्याची घटना रविवारी (दि. २) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अजिंठा पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शिवना येथील प्रसिद्ध इलेक्ट्रिकल दुकानात शरद कानडे यांच्या मालकीच्या श्री साई इलेक्ट्रिकल्स दुकानात विद्युत मोटार दुरुस्तीसाठी लागणारी मौल्यवान तांब्याची तार मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आली होती. शनिवारी रात्रीपासून पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी आधुनिक कटरच्या सहाय्याने शटरचे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला. त्यांनी दुकानातील सुमारे चार लाख रुपये किमतीची तांब्याची तार लंपास करून चोरटे पसार झाले.

रविवारी सकाळी दुकान उघडल्यास शरद कानडे यांना चोरीची बाब लक्षात आली. शटरचे कुलूप तुटलेले दिसले. दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले असून तांब्याच्या तारांचा मोठा गाठ गायब असल्याचे लक्षात येताच त्यांना धक्का बसला. त्यांनी घटनेची माहिती अजिंठा पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

विशेष म्हणजे, दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरीची घटना कैद झाली आहे. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा शोध सुरू केला असून परिसरातील अन्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजही तपासण्यात येत आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# कोमनादेवी ऑक्सिजन पार्क, सारडे येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण तालुक्यातील सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. काही वर्षांपूर्वी या डोंगरावर एकही झाड नव्हते. मात्र, सारडे विकास मंचाच्या अथक प्रयत्नांतून आज येथे हजारो वृक्ष दिमाखात डोलताना दिसत आहेत. या हरित उपक्रमामुळे ऑक्सिजन पार्क निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र बनले असून, दररोज अनेक नागरिक येथे भेट देत आहेत.

वृक्षारोपण कार्यक्रमानिमित्त निशा प्रितम म्हात्रे (कोप्रोली) यांच्या हस्ते ऑक्सिजन पार्कमध्ये सातत्याने कार्य करणाऱ्या १२ महिला मजुरांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा स्तुत्य उपक्रम ठरला.

याच कार्यक्रमात बॅचलर ऑफ आर्ट्स इन कलिनरी आर्ट्स हे शिक्षण पूर्ण करून दुबई, चीन, मालदीव, श्रीलंका, कतार व ओमान या सहा देशांमध्ये कार्याचा अनुभव घेऊन परतलेल्या शुभम प्रमोद पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उरण पूर्व विभागात २४ तास अॅम्ब्युलन्स सेवा देणारे सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी, पोलीस हवालदार विजय पाटील (तळोजा), रमेश घुगरे, स्वप्निल म्हात्रे, माजी सरपंच प्रसाद पाटील (वशेणी), सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, आदर्श शिक्षक उपेंद्र ठाकूर, निवास गावंड (अध्यक्ष, सुयश क्लासेस, आवरे), निशा प्रितम म्हात्रे, प्रितम म्हात्रे, प्रा. अनिल नायडू, प्रशांत म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संजीवनी म्हात्रे, एमडीएस हॉटेलचे मालक नितीन म्हात्रे, गणेश भोईर, कृषी मित्र प्रकाश माळी, रोशन घरत, गजानन ठाकूर, कार्यक्रमाचे निवेदक चेतन पाटील, अजित पाटील, हितेश म्हात्रे, मुकेश म्हात्रे, विनोद पाटील, प्रमोद पाटील, मंगेश पाटील, अतुल पाटील, विनायक गावंड, भावार्थ गावंड, नरदास कोठेकर, रामनाथ पाटील, गणेश पाटील, धनेश गावंड, सुमित पाटील, शुभम पाटील, योगेश माळी, मयूर माळी, सायली नवघरकर, रियांश, आध्या, गौरंग, ऋत्विक, सौरभ, सम्राट, श्री राधाकृष्ण महिला ग्रुप, सुलक्षणा पाटील, भगवती पाटील, कविता गावंड, मंदा ताई, पुष्पा ताई, कल्पना ताई, अर्चना ताई, जागृती ताई, जयश्री ताई, कलावती पाटील, गीता पाटील, कोमल पाटील, सौम्या, प्रिन्स, वेदिका, रुंजल तसेच सारडे विकास मंचाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमातील उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था अजित पाटील यांच्या वतीने करण्यात आली, तर चहाची व्यवस्था प्रकाश माळी यांनी केली. यावेळी सारडे विकास मंचाचे सदस्य आणि अनेक निसर्गप्रेमींनी रोप भेट देऊन वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी निवेदन चेतन पाटील यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घनश्याम गवंडी यांनी उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले, "आपण जे काम करतो ते चुकीचे आहे का? ते वाईट आहे का? ते पाप आहे का? ते खोटे आहे का? आणि त्या कामामुळे कुणाला त्रास तर होत नाही ना? जर यापैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेल, तर समाजासाठी चांगले कार्य करत राहा." त्यांच्या या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

निशा प्रितम म्हात्रे यांनीही महिला मजुरांच्या जिद्दीचे, परिश्रमाचे आणि सेवाभावाचे कौतुक केले. उन्हाळा, पावसाळा किंवा वारा यांची पर्वा न करता त्या स्वतःच्या घरचे काम समजून ऑक्सिजन पार्कची सेवा करत असल्याबद्दल त्यांनी त्यांना सलाम केला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, महिला मजूर, स्वयंसेवक, निसर्गप्रेमी आणि नागरिकांचे सारडे विकास मंचाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे अत्यंत यशस्वी ठरला.


मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911